महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७५ वा | दिनांक : ०२/०९/२०२५ | वार : मंगळवार


## आमच्यावर अन्याय झाला तर लाखोंच्या लोंढ्यांसह मुंबईत येणार - छगन भुजबळांचा इशारा



**नाशिक :** आमच्यावर अन्याय झाला तर आम्ही देखील लाखोंच्या लोंढ्यासह मुंबईत दाखल होणार आणि आम्हाला कोणीही रोखू शकणार नाही, असा इशारा छगन भुजबळ यांनी दिला आहे. तसेच ओबीसी प्रवर्गात अजून कोणत्याही जातीला आणू नका, असेही त्यांनी पत्रकार परिषदेतून म्हटले आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाज मागास नाही हे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. तसेच मराठा-कुणबी एकच मानणे हे सामाजिक मूर्खपणाचे असेही कोर्टाने म्हटले आहे. सामाजिक मागास नाही अशांसाठी व आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना ईडब्ल्युएस लागू करण्यात आले आहे. मराठा समाजाला जे काही दहा टक्के आरक्षण देण्यात आले आहे, ते देखील टिकवण्यासाठी कोर्टात लढाई सुरू आहे. आता यांची मागणी आहे की ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लातूर आणि धाराशिवचे जे गॅझेटमध्ये मराठा आणि कुणबी अशी वेगवेगळी जनसंख्या नोंदवण्यात आली आहे. १९२१ मध्ये सुद्धा कुणबी जे आहेत ३४ हजार ३२४ आणि मराठा १४ लाख ७२०० हे संपूर्ण मराठवाडाचे आहे. १ कोटी २४ लाख ७१ ही एकूण लोकसंख्या त्यातील ३४ हजार कुणबी आणि मराठा १४ लाख ६० हजार. जे शेतकरी आहेत ते कुणबी आहेत असे ते म्हणतात, ब्राह्मणांची सुद्धा शेती आहे, सगळ्याच समाजाच्या शेती आहेत, त्यांना कुणबी म्हणायचे का मग?

आज मुख्यमंत्र्यांना मी स्वतः भेटलो तेव्हा दोन्ही उपमुख्यमंत्री होते, त्यांना सुद्धा सुप्रीम कोर्टाचे निर्देश, उच्च न्यायालयाचे निर्देश, गॅझेट हे सगळे दाखवले. संविधान मानत असाल तर हे सगळे संविधानातून निर्माण झालेली कागदपत्रे आहेत ते मान्य करावे लागेल. ते आणि सरकार बघून घेतील काय करायचे ते. आता आपण पण सुरुवात करायची आहे. आमच्या ओबीसीमध्ये दुसरे वाटेकरी नको.

मराठा समाज ज्यावेळी आला तेव्हा देशमुख कमिटी, बापट कमिटी व इतर दोन आयोगांनी नकार दिला. सुप्रीम कोर्टाने नकार दिला, उच्च न्यायालयाने नकार दिला. मुख्यमंत्र्यांच्या हातात काहीच नाही. शरद पवारांनी जे मंडल आयोगाने सांगितले त्याची फक्त अंमलबजावणी केली. आयोगाने मान्य केले तरच एखाद्या जातीला आरक्षण दिले जाते. मुख्यमंत्री किंवा कोणत्याही सरकारच्या हातात हे नसते. त्यामुळे फडणवीस यांना नाव ठेऊन काहीच होणार नाही.

## आंदोलक हे काही आरोपी नाहीत मनोज जरांगेंच्या वकिलांचा युक्तिवाद



**छत्रपती संभाजीनगर :** आज पर्यंत मनोज जरांगे यांनी कोर्टाच्या आदेशाचे पालन केले असल्याचे त्यांचे वकील श्रीराम पिंगळे यांनी म्हटले आहे. जरांगे यांनी आमरण उपोषणाचे निवेदन आधीच दिले होते. आंदोलक हे काही आरोपी नाहीत, असेही त्यांनी म्हटले आहे. सरकारने अन्न, पाणी आणि वीज दिलेच पाहिजे. जरांगे यांचे आंदोलन हे सरकारच्या विरोधात आहे, जनतेला कुठलाही त्रास देण्याचा हेतु नाही, असे पिंगळे म्हणाले.

मुंबई उच्च न्यायालयात आज मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर सुनावणी झाली, त्यानंतर वकील पिंगळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, मनोज जरांगे यांनी यापूर्वी ७-८ वेळा आंदोलन सोडले आहे. मुंबईत मराठा आंदोलक कोणालाही त्रास देत नाहीत. जे काही झाले असेल ते ॲक्शनला रिएक्शन आहे. मराठा आंदोलकांची संख्या मुंबईत वाढत असून अन्न-पाण्याची सोय करण्यात यावी. तसेच मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य केल्या असत्या तर ही वेळ आलीच नसती.

मराठा आंदोलकांकडून महिला पत्रकारांना त्रास दिला जात असल्याचा आरोप केला जात आहे. यावर स्पष्टीकरण देताना पिंगळे म्हणाले, मनोज जरांगे यांनी काल भाषणात आदेश दिले आहेत की ते जे कोणी असतील त्यांच्या कानाखाली मारा. परंतु, महिलांना त्रास देण्याची आमची संस्कृती नाही. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी चालणारे मराठे आहोत. त्यामुळे असे काही होणार नाही आणि तुम्ही देखील चुकीच्या बातम्या लाऊ नये, अशी विनंती पिंगळे यांनी केली आहे.

पुढे बोलताना वकील श्रीराम पिंगळे म्हणाले, खाण्याची दुकाने आमच्यासाठी बंद ठेवण्यात आली होती. सार्वजनिक शौचालय बंद होती. त्यामुळेच आंदोलकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. तसेच न्यायालयाने आता आणखी मराठा आंदोलकांना मुंबईत येऊ देऊ नका असे निर्देश दिले आहेत. आंदोलनकर्त्यांना मुंबईत आणणार नाही याची देखील जरांगे यांना विनंती करतील, अशी भूमिका पिंगळे यांनी घेतली आहे.

## मराठा आंदोलकांना वानखेडे स्टेडियम द्या - मनसेची मागणी



**मुंबई :** राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना आझाद मैदानाऐवजी वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. मराठा आंदोलकांसाठी आझाद मैदान अपुरे पडत आहे. त्यामुळे त्यांना वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून द्यावे, असे मनसेने म्हटले आहे. यावेळी मनसेने मनोज जरांगे यांनी राज ठाकरेंवर केलेली टीकाही फेटाळून लावली.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांनी आज मनसैनिकांना मराठा बांधवांना सर्वोतपरी मदत करण्याचे आवाहन केले. त्यानंतर मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी पत्रकारांशी बोलताना मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे स्वरुप पाहता आंदोलकांना आझाद मैदानाऐवजी वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून देण्याची मागणी केली. ते म्हणाले, सरकारने मराठा आंदोलनावर लवकरात लवकर तोडगा काढावा. आंदोलकांसाठी आझाद मैदानाची जागा कमी पडत आहे. मराठा बांधवांची इतरत्र व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासनाने त्यांना मुंबईतील वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून द्यावे. असे झाले तर त्यांना एकाच ठिकाणी हवी तेवढी जागा मिळेल. राज ठाकरे यांचा स्वभाव सर्वांना माहिती आहे. ते स्पष्ट बोलतात. त्यांच्या पोटात एक आणि ओठात एक असे नसते. आज अमित ठाकरे यांनीही मनसैनिकांना मराठा बांधवांना सर्वोतपरी मदत करण्याची सूचना केली. हे लोक आपले आहेत. त्यांचा लढा सुरू आहे. त्यांना मदत करा. त्यांना काहीही कमी पडू देऊ नका असे ते म्हणालेत. तशा सूचना आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना केल्या आहेत. माझी मनोज जरांगे पाटील व मुंबईत आलेल्या आंदोलकांना विनंती आहे की, त्यांनी कायदा व सुव्यवस्था बिघडवू देऊ नये. त्यांनी या प्रकरणी योग्य ते नियोजन करावे. गणेशोत्सवाच्या काळात कुणालाही कोणतीही अडचण होऊ नये हा विचार त्यांनी करावा. सरकार या प्रकरणी काही कमी पडतेय का? यावर बोलणे योग्य ठरणार नाही. गणेशोत्सवाच्या काळात काही ताण असतो, पण सरकार कमी पडत असे नाही.

कारण ते ही आपल्या पातळीवर काम करत आहे. त्यांनी या आंदोलनावर सकारात्मक मार्ग काढावा अशी आमची मागणी आहे. प्रस्तुत आंदोलनासाठी राज्यभरातील बांधव आलेत. त्यांना परवानगी देण्यात आली आहे. पण कोर्ट हेच सर्वस्व आहे. न्यायालयात लवकर निर्णय होईल आणि मुंबईत आलेले मराठा बांधव आनंदात परत जातील, असा विश्वासही बाळा नांदगावकर यांनी यावेळी व्यक्त केला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ सप्टेंबर २०२५


## प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना "राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्कार"



**मुरुम : (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तालुक्यातील जवळगा बेट येथील सुपुत्र आणि लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना भारतीय दलित पँथरच्या वतीने नुकताच "राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्कार" प्रदान करण्यात आला.डॉ. गायकवाड हे नामवंत समाजशास्त्रज्ञ, संवेदनशील विचारवंत, अभ्यासू लेखक आणि सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांनी विविध विद्यापीठे, संस्था आणि संघटनांमध्ये महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या असून, त्यांच्या व्याख्यान व लेखनातून समाजप्रबोधनाचा प्रभावी मार्ग उभा राहिला आहे.उपेक्षित, वंचित आणि शोषित घटकांच्या हक्कांसाठी ते गेली अनेक दशके सातत्याने कार्यरत आहेत.सामाजिक बांधिलकी, विचारांची सत्त्वता आणि प्रेरणादायी संघर्षमय जीवनप्रवास यांचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांचे कार्य होय.त्यांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक व प्रबोधनात्मक कार्याची दखल घेत, हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून त्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## खामगाव मध्ये गौरी पुजन



**फुलंब्री :** फुलंब्री तालुक्यातील खामगाव नाथांचे येथे घरोघरी महालक्ष्मी चे मनोभावे पुजन करण्यात आले. गणपती बाप्पा च्या स्थापनेनंतरउत्सुकता असते. गौराई आगमनाची. 31 ऑगस्ट लागौरी आवाहन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी गौरी पूजन मनोभावे करण्यात आलेभाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात गौरीचे पूजन केलं जातं, गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार केला. तेव्हापासून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. गौरी पूजनला काही ठिकाणी महालक्ष्मीपूजन असंही म्हणतात, गौरी किंवा महालक्ष्मीचं पूजन ज्येष्ठ नक्षत्रावर केलं जातं, म्हणूनच याला ज्येष्ठागौरी असंही म्हटलं जातं.माहेरवाशीण गौराईसाठी पंचपक्वानांचा नैवेद्य करण्यात आला. गौराईचं अगदी माहेरवाशीणीसारखं स्वागतकेलं जातं. यंदा भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात अनुराधा नक्षत्रावर घरोघरी गौरीचं आगमन झाल. गौराईसाठी पाहुणचार करण्यात आला, यामध्ये १६ भाज्या, पंचपक्वान्न असा बेत केला जातो. गौराई पूजनानंतर दुसऱ्याच दिवशी मूळ नक्षत्रावर गौरीचं विसर्जन केलं जातं. खामगांव येथील अशोकराव भाले यांच्या घरी महालक्ष्मी पूजन विधीयुक्त करण्यात आले, महालक्ष्मी स्थापना केल्याने घरात सुख, शांती आणि समृद्धी लाभते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

## श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर कन्नड येथे विद्यार्थी सुरक्षा मार्गदर्शन कार्यक्रम




**कन्नड :** श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर कन्नड येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पिंक पथक सदस्य पोलीस नाईक श्री अमोल गायकवाड यांनी शाळेला भेट दिली.या वेळी विद्यार्थ्यांना विद्यार्थी सुरक्षा, बालकांवरील होणारे लैंगिक गुन्हे तसेच असे गुन्हे होऊ नयेत यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.शाळेच्या वतीने मुख्याध्यापक श्री प्रकाश जिरेमाळी यांच्या हस्ते श्री अमोल गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक श्री शिवाजी वाघ, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ सप्टेंबर २०२५


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने डॉ. वासुदेव मुलाटे यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर** : ग्रामीण साहित्य व चळवळीचे एक प्रमुख आधारस्तंभ व परिवर्तनवादी चळवळीचे मार्गदर्शक डॉ वासुदेव मुलाटे यांना अंबाजोगाई येथील स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार नुकताच जाहीर झाला. हा पुरस्कार त्यांना १९ सप्टेंबर २०२५ रोजी अंबाजोगाई येथे पुरस्कार सोहळा घेऊन प्रदान करण्यात येणार आहे. डॉक्टर वासुदेव मुलाटे हे ग्रामीण ललित लेखकासोबतच एक चिंतक, साक्षेपी समीक्षक, नवोदित लेखकांचे मार्गदर्शक व विद्यार्थी प्रिय शिक्षक आहेत. त्यांच्या नावावर साहित्य, समीक्षा व संपादने मिळून जवळपास ५० ग्रंथ आहेत. यापूर्वीही त्यांना राज्य शासनाच्या पुरस्कारासह विविध वांग्मय पुरस्कार मिळाले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी विविध साहित्य संमेलनाची अध्यक्षपदेही भुषविली आहेत. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराने आणखी एक मानाचा तुरा त्यांच्या व्यक्तित्वाला प्राप्त झाला. या निमित्ताने दिनांक एक सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने प्राचार्य डॉक्टर भगवान कांबळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. मोहन सौंदर्य, सचिव प्रोफेसर डॉ. युवराज धबडगे, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद वाव्हळे, प्रा. डॉ. बाळासाहेब गायकवाड, प्रा. डॉ. सुधाकर नवसागर इत्यादींची उपस्थिती होती.






# किरीट सोमय्या यांच्यावर संभाजीनगरमध्ये हल्ला



**छत्रपती संभाजीनगर** :भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांच्यावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे हल्ला झाला आहे. त्यांनी स्वतः:च एका ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे. या हल्ल्यात नेमक्या कोणत्या प्रकारचे नुकसान झाले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे अवघ्या राज्याचे राजकारण तापले असताना ही घटना घडल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

किरीट सोमय्या आज सकाळी सिल्लोड पोलिस व तहसीलदारांकडे ११०० बोगस जन्म प्रमाणपत्रांच्या फसवणुकीचे पुरावे सादर करण्यासाठी गेले होते. तिथे त्यांच्यावर व त्यांच्या गाडीवर हल्ला झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. या घटनेची एका ट्विटद्वारे त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथील उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयाबाहेर माझ्यावर व माझ्या गाडीवर हल्ला करण्यात आला. हा हल्ला मुस्लिम अतिरेक्यांनी केला. पण सीआयएसएफ सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना हाकलून लावले. त्यानंतर मी सिल्लोड पोलिस व एसडीओ तहसीलदार यांच्याकडे ११०० बोगस जन्म प्रमाणपत्रांच्या फसवणुकीचे पुरावे सादर केले. महाराष्ट्रात जन्म प्रमाणपत्र मिळवणाऱ्या २.२४ लाख अपात्र, घुसखोर, बेकायदेशीर व्यक्तींविरोधातील माझा लढा सुरू च राहील. तत्पूर्वी, किरीट सोमय्यांनी अन्य एका ट्विटद्वारे सिल्लोड व संभाजीनगर येथील काही मुस्लिम नेत्यांनी आपल्याला इशारा दिल्याचा दावा केला होता. त्यांनी मुस्लिम नेत्यांचे यासंबंधीचे एक निवेदनही सार्वजनिक केले होते. या निवेदनात नमूद करण्यात आले होते की, माजी खासदार किरीट सोमय्या हे सिल्लोड शहरात येऊन आम्हा भारतीय मुस्लिमांच्या नागरिक्तवासंदर्भात दिशाभूल करून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. किरीट सोमय्या यांना आवर घाला नसता आंदोलन करण्यात येईल. या निवेदनावर लखन ठाकूर,अख्तर मौलाना,कॉम्रेड सय्यद अनिस,मुखतार सादिक हुसैन,अकरम शेख,शेख शाकेर,फहीम खाँ मुनिर खाँ पठाण,शेख मुंतजिर उर्फ बल्लू ,शेख इमरान (उर्फ गुड्डु),साहेब खान पठाण,सलीम खान दादा,शेख नजीर यांच्या सह्या आहेत.

## बाहेरून येणारे आंदोलक देशी दारूच्या बाटल्या आणत आहेत - गुणरत्न सदावर्तेंचा दावा



**मुंबई** : न्यायालयात सुनावणीदरम्यान, वकील गुणरत्न सदावर्ते यांनी असा युक्तिवाद केला की, माझ्या मुलीला उद्या शाळेत जायचे आहे, परंतु मराठा आंदोलकांसमोर पोलिस हतबल झाले आहेत. बाहेरून येणारे आंदोलक वाहनातून देशी दारूच्या बाटल्या आणत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

यावर मराठा आंदोलकांच्या वकिलांनी, आंदोलक जेवणाचे साहित्य घेऊन येत असतील तर त्यांना मुंबईत येऊ द्यावे असा युक्तिवाद केला. सदावर्ते यांनी यावर प्रतिवाद करताना म्हणाले, राज्याचा मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून हे सर्व सुरू आहे, असा आरोपही त्यांनी केला. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनासंदर्भात दाखल याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी सुट्टी असूनही तातडीने सुनावणी घेतली. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता मंगळवारी होणार आहे.

गुणरत्न सदावर्ते पुढे म्हणाले, आंदोलनाला काही अटींसह परवानगी देण्यात आली होती. आता संपूर्ण दक्षिण मुंबई परिसरात रास्ता रोको केला जात आहे. आरक्षणाच्या राजकारणामुळे हे सगळे सुरू आहे. या आंदोलनात थेट राजकीय हस्तक्षेप आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांचा पक्ष आंदोलनकर्त्यांना ट्रकने सगळे पुरवत आहेत.

मराठा आंदोलकांना आझाद मैदानावर आंदोलनासाठी जागा दिली असतानाही ते इतर अनेक ठिकाणी दिसत आहेत. त्यामुळे, बाहेरून येणाऱ्या आंदोलकांना आता थांबवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्याचबरोबर, सीएसएमटी, मरिन ड्राईव्ह, फ्लोरा फाऊंटनसह दक्षिण मुंबईतील आंदोलकांना हटवण्याचे आदेशही न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोर्टाच्या आदेशाचे पालन करणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. बैठकीत आम्ही मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सगळ्या पर्यायांचा विचार केला तसेच या बाबी कोर्टात कशी टिकेल यावर चर्चा करण्यात आली. महिला पत्रकारांचा विनयभंग हे कुठेतरी गालबोट असल्यासारखे आहे. मराठा समाजाच्या आंदोलनात असे कधी झाले नाही. परंतु, हे अतिशय निंदनीय असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ सप्टेंबर २०२५

# सट्टक : जाणीवपूर्वक जीवनवादी चिंतनातली कविता - डॉ. सुधीर रा. देवरे

आताच प्रकाशित झालेला भालचंद्र नेमाडेंचा 'सट्टक' नावाचा कवितासंग्रह वाचला. पहिल्या वाचनातच ही कविता थेट भिडावी अशी तिची जाणीवपूर्वक रचना, मांडणी आणि एकूण सौष्ठवी शब्दपसारा आहे. संग्रहात तीन विभाग असून त्यांची शीर्षकं अनुक्रमे 'सरवा', 'अस्तुरीमृग' व 'मृत्यू' असे आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या नावाला 'ज्ञानपीठा'मुळे साहजिकच आता एक तेज:पुंज वलय प्राप्त झालं आहे. म्हणून कवीनं या कवितासंग्रहात नेमका कोणता काव्याविष्कार घडवला, याची सजग वाचकांत खूप आधीपासून उत्कंठा ताणलेली होती. आणि ह्या काव्यात्मक कलाविष्कारांत नेमाडे यांनीही जीव ओतून त्यांचं योगदान दिलं आहे. 'अर्ध्या हाकेवर मर्ढेकर पैलतटावर बालकवीडाव्या बाजूला मुक्ताई जेवन्या हाताशी बहिणाबाईअरे बोंगाड्या, तुलाच कशी कविता येत नाही' या ओळी संग्रहाच्या सुरूवातीला अवतरण म्हणून आल्या असल्या तरी ही एक स्वतंत्र कविताच आहे. भालचंद्र नेमाडे यांचं मुळगाव सांगवी तालुका यावल जिल्हा जळगाव. म्हणजेच त्यांच्यावर बालपणातले संस्कार खान्देशातील असून त्यांची मातृभाषा अहिराणी आहे. मर्ढेकर, बालकवी, मुक्ताई, बहिणाबाई यांची जन्म-कर्मभूमीसुध्दा याच आजूबाजूच्या परिवेशातली. अशी थोर काव्य परंपरा पार्श्वभूमीला इथल्या सुपीक जमिनीत रूजलेली असूनही आपल्यालाच का कविता येत नाही, म्हणून त्रयस्थाच्या नजरेनं कवी स्वत:लाच कोसत, दम देत तिरकस विचारणा करतो. 'बोंगाड्या' हा अहिराणी भाषिक शब्द आहे. खाऊनपिऊन थोराड- मोठा झालेला सुस्त तरूण, असा हेटाळणीच्या स्वरात यात अर्थ दडलेला आहे. ह्या समग्र कवितेत बोंगाड्या, डिर, हुरहुर, सरवा, पसरीसन, फटफटनं, मुरहाळी, कुडी, हादड, औत, मिचूक, निसूर, भौ, चीर, आर, रामरगाडा, पोतारनं, फटफटनं, माया लावनं, जायदाद, आंदण, कुटाणा, परणून, बिलामती, हरकाम्या, हेला, किडुक मिडुक, झकमारी अशा अहिराणी- खान्देशी भाषेच्या शब्द-हेलांसहीत मालवणी- कोकणी, वैदर्भी, वऱ्हाडी, सातारी, कोल्हापुरी, हिंदी, गोव्यात बोलली जाणारी, इंग्रजी अशा अनेक भाषा उपयोजित होत राहतात. मराठीच्या बऱ्याच बोलींचा नांद या कवितेतून सहज ऐकू येत राहतो. ही कविता समग्र मानवी जीवन उपयोजित करत असल्यानं तिला कोणत्याही भाषेचं वावडं नाही. "Poetry is just the evidence of life. If your life is burning well, poetry is just the ash." (Leonard Cohen, 1934 - 2016). कॅनडाचे कवी लिओनार्ड कोहेन यांच्या या व्याख्येनुसार भालचंद्र नेमाडे यांची ही कविता नेमकी कुठं उभी आहे. तुमचं (स्वत:चं) जीवन जळत असेल तर कविता फक्त राख आहे, असं सांगणारं हे अवतरण ह्या कवितेवर काय भाष्य करेल? ह्या बहुतांश कवितेत मानवी जीवन जळताना दिसत असल्यानं समष्टीच्या कवितांना ही व्याख्या उचलून धरते, पण कवीच्या व्यक्तिगत जीवनातील वेदनेला इथं स्थान नाही. म्हणून परकायाप्रवेशावर ही व्याख्या उपयोजित केली तर कविता रसिक मान्य होते. ही समग्र कविता व्यक्तीच्या नव्हे तर प्रातिनिधीक उसन्या जीवनाची साक्ष होत राहते. तरीही परतत्वस्पर्शाला अनुभूतीनुर अगदी खेटून स्पर्श होत नाही. 'सट्टक'चा आशय पूर्णपणे सामाजिक जीवनवादी आहे. मानवी वृत्तीचा प्रवास कथात्मकतेनं दाखवत महाकाव्याच्या घाटाकडं झेपाऊ पाहणारा हा आकृतीबंध आगळावेगळा आणि अपवादात्मक आहे. ह्या कवितेतल्या बाह्य गोष्टींचा आवाज ऐकता ऐकता रसिक आत अंतर्मुख होत राहतो. माणसाचं जन्मनं, असणं, जगणं, व्यथा भोगणं आणि शेवटी खंगून मरणं या नैसर्गिक आणि टाळता न येणाऱ्या अवस्था शब्दांत मांडणारी ही खास देशीय आशावादी कविता आहे. कवीचं जगणं व भवतालचा परिवेश म्हणजे ह्या कवितेचा पोत. शेती, गाव, समाज, लोकसंस्कृतीतून ही कविता उपयोजित होत राहते. स्त्री- जीवन जाणिवा, स्त्री- पुरूष सहजीवन पुरकता, स्त्री उदारता, मुळासहीत उपटून परक्या संवेदनाहीन घरात बळजबरी लागवड केल्या जाणाऱ्या स्त्रियांची फरपट, स्त्री जातीची भळभळती जखमी वेदना, माणुसता, मानवी सहसंवेदना आदी बाबी विशेषत: 'अस्तुरीमृग' या दुसऱ्या विभागात अधोरेखित होतात. कवितेत साचेबध्द वस्तुनिष्ठता नाही पण पुरेपुर आत्मनिष्ठता असल्याचं लक्षात येतं. बहुतांश कवितेत कवीच्या परिवेशातून स्व चा सखोल शोध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न होताना दिसतो. स्व खोदताना कवीच्या नेणिवेतला तर स्त्रीवादी कवितेत जाणिवेतला अगदी तळातून सूर लागतो- 'स्त्रिये तव प्रकारांना गणतीच नाहीपिले नोवरे ह्यांच्यामधली तू ग्वाहीसर्वांगी सुंदर तू कुठलीही बाई,रस्त्यात घरात तू प्रेमाची व्हाही जयदेवी जयदेवी जय कोमलांगी प्रसवशालिनी जीवसृष्टीची कर्ती ।।धृ।।' (आरती स्त्रीची, कविता-२५) स्त्री उदारतेच्या स्वयंभू आदरानं, भक्तीनं कवी स्त्रीच्या त्यागाची- थोरतेची आरती करतो, स्त्रीतल्या विविध प्रकारांचे अगणित रूपं आठवतो. नवरा आणि मुलांतली ती ग्वाही असते, स्त्री कशीही- कोणतीही असो ती सुंदरच असते, बाहेर असो की घरात स्त्री म्हणजे कोमल अंगाचं मूर्तीमंत प्रेम, आपल्या देहातून प्रसवत जीवसृष्टी अबाधित ठेवणाऱ्या स्त्रीची अशी ही भक्तीमय आरती आहे. कोणत्याही काल्पनिक देवीपेक्षा आपल्या भोवती वावरणाऱ्या ढळढळीत वास्तव हाडामांसाच्या स्त्रीची ही आरती कितीतरी पटीनं माणसाळत भावनारी ठरते. इतर अनेक मागण्यांसोबत इंग्रजीच्या अतिहव्यासानं आपलं स्थानिक प्रातीय सांस्कृतिक- भाषिक संचित कसं दिवसेंदिवस हरवत चाललं, ह्याचा दाह पारंपरिक पध्दतीनं देवाकडं मांडल्या जाणाऱ्या कोकणातल्या 'गारहाण्या'तून कवी मांडतो- 'इंग्रजी माध्यमाच्या शाळा बंद पाड लेकरांचा सत्यानाश थांबव रे म्हाराज्या होय म्हाराज्या ऽऽ' (गारहाणं, कविता– २९). इंग्रजी माध्यमाच्या शाळा बंद करण्याचं 'गारहाणं' मांडणारी ही कविता प्रखर सामाजिक, देशीयतावादी असूनही एकाही गाऱ्हाण्यात ढोबळ, बटबटीत आशयाची व वरवर पाहून ऐकून आवाजी होत नाही. अंगाईगीतं व त्यांची चाल, इतर समकालीन कवींच्या कवितांचे संदर्भ, कवितेच्या मोडतोड केलेल्या ओळी, धार्मिक आरत्या, ओव्या, लोकगीतं, कोकणातल्या पारंपरिक 'गारहाण्या'चा घाट, नाट्य, आख्यान, लोककथा-कथा अशा सांस्कृतिक परंपरेसह प्रमाण मराठी भाषा, वर्तमानपत्री भाषा, छापण्याची भाषा, स्वातंत्र्य काळातील भाषा, शिवकालीन- तुकाराम कालीन भाषा, विविध भाषिक आणि अनेक काव्य परंपरांचे स्वर या कवितेतून शेवटपर्यंत गजर करत राहतात. विशेषत: स्त्रीवादी कवितांत कष्टकरी, खस्ता खाणाऱ्या, चूलमुलातच आयुष्य घालवणाऱ्या महिलांचं भळभळतं दु:ख, त्यांच्या ठसठसत्या जखमा मांडताना हवाई कल्पनाविश्वात रमण्यापेक्षा 'स्त्रीधर्मसूर्ये लाहो' म्हणत ढळढळीत प्रखर वास्तवावर भर देत कवी दांभिकपणाचं वाभाडं काढतो- 'धर्माच्या नावानं आपल्याला राजरोस भोगलं यज्ञात देवळात, तो धर्म गाडून टाकूविज्ञानानं आपल्या बाळंतपिडा कमी केल्या, चूलमूल जाच मिटवले, त्याची काच धरू' 'ही मासिक पाळी वार्षिक तरी करा – दरमहा आपल्यालाच का हा बोळ्यांचा कुटाणाहाच रजस्वल होत राहील, लग्नानंतर आपल्याकडे नांदायला येईल,नाव त्याचं बदलून कुंकू मंगळसूत्र हिरवा चुडा भरेल असं करा.' (मातृका, कविता– ४४, २. मादी). धर्माच्या नावानं महिलांचं शोषण करणाऱ्या तथाकथित पारंपरिक दांभिक व्यवस्थेची अशी आडवी-उभी चिरफाड करत कवी खडबडीत, खडकाळ काव्यातून कलाविष्कार सजवतो. इथं कोमल काव्याला अजिबात स्थान नाही. कुठं ओव्या कुठं अभंग तर कुठं लोकगीतांच्या फॉर्मचा आसरा घेत कवी सडलेल्या व्यवस्थेशी बंड पुकारून लोक जागृतीची तुतारी जोरानं जोशात फुंकत राहतो. मूल जन्माला घालण्यासाठी इस्पितळात भरती झालेल्या स्त्रीची अशीच एक कविता 'रात्र काळी घागर काळी' च्या ठेक्यावर लोकधाटीतून आविष्कृत होते-'नाकाला झोळी घशाला नळी छातीत भाता डोळ्यांवर अंधारी डोक्यातबी पुरा काळोख वं माय' (मृत्यो, १. मरणखूण, कविता– ५७,) दुसऱ्या 'अस्तुरीमृग' भागात प्रातिनिधीक स्त्री ची कथा सुरू होतेय की काय? असं सुरूवातीला वाटू लागताच पुढं पुरूषाच्याही वेदना ऐकू येऊ लागतात. पण काही कविता प्रामुख्यानं स्त्री विषयक असून ह्या भागात जास्तकरून कवीच्या उदारमतवादी स्त्री- जाणिवा व्यक्त होत राहतात. पुरूषावर स्त्री आरोपीत करत कवी म्हणतो-'त्या निर्मातीचे चिरंतन आभार – नाहीतर तुम्हीच केले असते माझ्यावर बलात्कार बरे सृष्टिदेवीने नर केलो, नाहीतर मेलो असतो सदा होत गरभार' 'आयुष्य गेलं शिश्नशुचिता सांभाळण्यात, आता भाळण्यात काय अर्थ दुसऱ्यांच्या झाल्यावर' 'कठीण समय असता कोण लफड्यात पडतो? ज्याचा हात धरू त्याचाही घात होतो' (प्रेमगीत : सिंफनी, कविता- ४५, २) अशा काही पूर्वसूरी आवाजी भान आणत गतिमान ओळीतून कवीच्या कल्पनाविश्वाच्या विस्तारीकरणातून विशिष्ट घटनेतील कविता अति-वास्तव होत साकार होऊ लागते. 'देवा तुझे किती पोकळ आकाश दारूण ते जगणे करूण हे मरणेनिष्ठुर हे देणे देवा तुझे' (मातृसत्ताक ताई, कविता- ५०) अशा करूणाष्टकातील कविताही आधीच उपलब्ध असलेल्या फॉर्म मध्ये बसवत स्व-चिंतनातून तालातोलाच्या परिघात अर्थविस्तार केला जातो.

कविता क्रमांक १ ते ३२ हा 'सरवा' नावाचा पहिला भाग, ३३ ते ५० दुसरा 'अस्तुरीमृग' भाग आणि ५१ ते ५८ हा तिसरा 'मृत्यू' नावाचा भाग, अशा एकूण ५८ कविता या संग्रहात समाविष्ट आहेत.दुसऱ्या आणि तिसऱ्या भागालाही स्वतंत्र अवतरण आहे- 'भोवता कित्याक रे येड्याअस्तुरी त तुझ्या बेंबीतच असा' (अस्तुरीमृग) अशा या सुचक मालवणी अवतरणासह दुसऱ्या भागात 'अस्तुरी' नावाची महत्वाची कविताही समाविष्ट आहे. शेवटच्या भागाचं नावच 'मृत्यू' असं आहे. या भागाला संत तुकाराम यांच्या एका अभंगाचं अवतरण आहे-'मरणाही आधी राहिलो मरोनी ।मग केले मनी होते तैसे ।।' मानवी जीवनाचं गूढ चिंतन 'मृत्यू' या विभागात होत राहतं. 'चिमा काय कामाची' ही कविता विविध अंगाईगीतांच्या चालीनं आविष्कृत होते. शेवटच्या भागात आठच कविता असून ह्या चिंतनशील कविता म्हणून सर्वोत्कृष्ट म्हणता येतील.

खूप सारे विलाप, भाषिक तोडण्या- घडण्या- मळण्या, साहित्यिक चर्चा, धर्मग्रंथ, पुराणं, मिथकं ह्या समग्र कवितेत उपयोजित होत राहतात. विशेषत: कविता क्रमांक ५६, ५७ मध्ये वरील सर्व गोष्टींचं भावणारं विस्तारीकरण दिसतं.

मृत्यूच्या संदर्भातही कवी आशावादी असल्यानं कविता जीवनवादी होत जाते. म्हणूनच शेवटच्या 'मृत्यू' भागातल्या शेवटच्या कवितेतल्या शेवटच्या दोन ओळी खूप महत्वाच्या ठरतात– 'आनंदान नांदून आपण हे दु:खद जग जगणीय केलं, भाऊआता आनंदात मरून मरणही स्मरणीय करून जाऊ.' (स्व, कविता- ५८) अशा गोजिऱ्या जगण्याच्या सोहळ्यानं मरणाला सामोरं जाण्यासाठी केलेला हा गोड शेवट जगणीय ठरतो. ह्या एकूण कवितेत अपयश, ठसठसत्या वेदना, कारूण्यासोबत संग्रहाचा शेवट मानवी आशावादाच्या यशस्वीतेत होतो. 'सट्टक' मध्ये अशा सगळ्याच अतिशय प्रखर वास्तववादी कविता आहेत. एकंदरीत असं असलं तरी ह्या संग्रहात काही खटकणाऱ्या बाबी आहेत. ह्या कवितेत कल्पनाविश्वाला खूप स्थान नाही, असेल तर ते दुय्यम आहे, असं म्हटलं तरी वावगं ठरू नये. म्हणूनच ह्या कवितेत प्रतिमा, प्रतिकं जास्त आढळत नाहीत. ह्या कवितेतले बरेचसे अनुभव अभिधात व्यक्त होत राहतात. यामुळं व्यामिश्रता कमी होताना दिसते. कवितेतून अनेक अर्थ निघत नाहीत. अनेकार्थाना मर्यादा येते. सुचकतेसह व्यंजना कमी पडते. कवितेच्या माध्यमातून कथा सांगितली जाते, असं वाटत राहतं. कवितेत रूपकं मात्र अधूनमधून येत राहतात.

'सरवा' ह्या पहिल्या विभागातली 'घराघरातून' शीर्षकाची पहिली कविता अपूर्ण आहे. अपूर्ण असायलाही हरकत नाही, पण ही कविता काव्यहीन असल्यानं ह्या संग्रहात घ्यायला नको होती. ह्या पहिल्या अपूर्ण कवितेत ग्रामीण- शेतकऱ्यांच्या परिस्थितीचं वर्णन हुबेहुब- खरं- वास्तववादी- देशीवादी- जीवनवादी असलं तरी त्यात काव्य कुठं आहे? या पहिल्या भागातल्या सुरूवातीच्या बऱ्याचशा कविता वर्णनात्मक आणि प्राथमिक स्वरूपाच्या आहेत. कविता क्रमांक १ ते १७ या अकविता असून त्यांपैकी ५, ७, १५, १६, १७ या त्यातल्यात्यात बऱ्या कविता म्हणता येतील. अगदी समकालीन अनुकरण वाटावं इतक्या त्या सामान्य वाटतात. संत कवितेपासून मर्ढेकरी कवितेपर्यंत काही ठिकाणी अनुकरणीय कविताही इथं आहेच, तर काही ठिकाणी याच पूर्वसूरींच्या कवितेचे फॉर्म आजचे विषय- आशय वाचकापर्यंत पोचवण्यासाठी मुद्दाम उपयोजित केले जातात.

वर उल्लेख केलेल्या कविता अलीकडील काळात एखाद्या नवोदित कवीचं नाव टाकून अथवा कवीनं उर्फ नाव धारण करून अनाहूतपणे एखाद्या वाङ्.मयीन नियतकालिकात छापायला पाठवल्या असत्या तर त्या छापल्या गेल्या नसत्या, असं वाटत राहतं. पिकाची कापणी झाल्यावर- पीक काढून झाल्यावर नजरेआड झालेली- चुकून राहून गेलेली जी वेचणी पुन्हा केली जाते, त्याला अहिराणी भाषेत 'सरवा' म्हणतात. म्हणूनच 'सरवा' ह्या पहिल्या भागात 'सुरूवातीच्या राहून गेलेल्या कविता' समाविष्ट करण्यात आल्या हे स्पष्ट आहे. यामुळंच १ ते १७ या क्रमांकाच्या कविता संग्रहात नको होत्या. १९ ते २१ या क्रमांकाच्या कवितांना 'कविता' म्हणता येईल. पण हा कवितासंग्रह कविता क्रमांक २२ पासून खऱ्या अर्थानं सुरू होतो. संग्रहातली चांगली कविता इथून पुढं वाचायला मिळते.

पहिल्या भागातल्या २५, २७, २८, २९, ३१, ३२ ह्या क्रमांकाच्या चांगल्या कविता आहेत. '... म्हाराज्या, होय म्हाराजा' हा 'गारहाणं' नावाचा कोकणातला लोकपरंपरेचा प्रकार असो, आरती असो, यमकी, बिगरयमकी, बाळबोध, आत्मकथनी, वैचारिक, ललितगद्य, कथात्म म्हणता येतील अशा अनेक साच्यात ओतलेल्या ह्या कविता आहेत.

काही कविता नको इतक्या पसरट आणि गद्य झाल्या आहेत. अनेक ओळीतल्या मात्रा बऱ्याच ओढूनताणून मागंपुढं होत असल्यानं वाचकाची दमणूक होते. म्हणून संग्रहातल्या अनेक कविता छंदोमयी नाहीत, मुक्त छंदातल्या नाहीत, तर केवळ मुक्त शब्दांत स्थूल आशय व्यक्त करणाऱ्या ठरतात. काही ठिकाणी सुटसुटीत पद्यातून ढळढळीत गद्य पेरण्याचा प्रयत्न होतो. ही कविता रसभरीत होण्याऐवजी रसभंग करते. म्हणूनच यातल्या काही कवितांत अस्ताव्यस्त पसरलेला फापटपसारा कमी करता आला असता असं सारखं वाटत राहतं.

कवितेत जाणीवपूर्वक यमकं जुळवलेली नाहीत, म्हणून हा धाडसी प्रयोग महत्वाचा वाटला. तरीही काही ठिकाणी यमकं बळजबरी ओढूनताणून जुळवलेली वाटतात. उदा. स्वप्नसंभार – फार, प्रकार – व्यभिचार (कविता- ४३)

काही क्वचित ठिकाणी शब्द खेळही खेळले जातात, असे वाटू लागते. उदा. 'ते करतील भ्रष्ट हे राष्ट्र दिसते स्पष्ट.' (कविता- ५२). इथं खणखणीत अनुप्रासापेक्षा रसभंग करणारा कर्कश आवाज ऐकू येतो. 'सट्टक' म्हणजे काय? असा प्रश्न पडणं साहजिक. म्हणून अनेकांकडून तो प्रश्न विचारला जातो. 'सट्टक' हा प्राकृतातील नाट्य- संगीताचा प्रकार आहे. यात विविध नाट्य प्रसंग एकत्र गुंफलेले असतात. लोकनाट्य, तमाशा या अर्थी. जुन्या अहिराणीतही हा शब्द रूढ होता. माझ्या लहानपणी म्हाताऱ्या बायांच्या तोंडून, 'तठे चालनं त्यास्न सट्टक' सारखी वाक्य ऐकली आहेत. म्हणजे 'चालल्या त्यांच्या बांगा- कऱ्या- नाटकं' वगैरे. (आता हा शब्द भाषेतून गहाळ झाला आहे.) अशाच सुत्रानं 'सट्टक' मधल्या कविता आविष्कृत होत राहतात.

भालचंद्र नेमाडे यांचे आतापर्यंतचे तीन कवितासंग्रह प्रकाशित झालेत. मेलडी (१९७०), देखणी (१९९१) आणि आताचा सट्टक (२०२४) ही ह्या कवितासंग्रहांची अनुक्रमे शीर्षकं. 'मेलडी' म्हणजे संगीत अथवा संगीताची धून. मराठीऐवजी इंग्रजी नाव ठेवण्याचं कारण कळत नाही. 'देखणी' हा गोव्यातला एक पारंपरिक संगीत व नृत्य प्रकार आहे. मुळात हा इथल्या आदिवासींचा नृत्य-संगीत प्रकार असून नंतर त्याच्यावर कॅथलीक संस्कार झाले. हे नृत्य गोव्यातल्या सणांत व उत्सवांत सादर केले जातं. असे हे तीनही कवितासंग्रह एकाच संगीत- नाट्य सूत्रात ओवलेली असून विशेष म्हणजे तिघांचीही नावं तीन अक्षरांचीच आहेत.

"सर्व वाईट कविता ह्या अस्सल भावनेतून उगवतात!" (ऑस्कर वाइल्ड). असं असेल तर ही समग्र कविता साहजिकच अस्सल भावनेतून आलेली ठरते. सारांश, ठरवून- जाणीवपूर्वक जीवनवादी- देशीवादी भूमिकेतून लिहिलेली व वेळोवेळी झालेल्या दीर्घ चिंतनातून आविष्कृत झालेली ही कविता आहे. मुखपृष्ठ चित्रकार माधवी पारेख यांनी चित्रीत केलेल्या मुखपृष्ठाचा अर्थ सुरूवातीला अजिबात लागत नव्हता. त्यानंतर हे चित्र अनेकदा पाहिलं- वाचलं. माणसाचं माणूसपण आणि माणसावरच आरोपित झालेले विविध जंगलराज प्रसंग या चित्रात स्पष्ट होतात. स्त्री ही कल्पनारम्यतेत उदारतेनं शिल्पीत- चित्रीत पुज्यनिय बहुभुजा शस्त्रधारी देवता आणि व्यवहारात मात्र वासनेनं आडवी केलेली मादी टहाळबन दाखवली आहे. पण ह्या समग्र कवितेत माणसाचं पशुपण जाणवेल असं ढोबळपणे आलेलं नाही, सुचकतेनं आहे, (चित्रात मात्र स्त्री भोवती विविध वृत्तीच्या माणसांसह काही मुक्या हिंस्र जीवांचा मुक्त संचार दाखवला आहे. विशेषत: साप). कवितेच्या समृध्द आशयाचा संपृक्त अर्क या मुखपृष्ठात उतरवण्यात चित्रकार यशस्वी झाल्या असून हे चित्र वारली लोकसंस्कृतीतील चित्रकलेचं आधुनिक रूप म्हणूनही ढोबळपणे पाहता- वाचता येतं.

**'सट्टक' भालचंद्र नेमाडे**
**पॉप्युलर प्रकाशन**
**मुखपृष्ठ : माधवी पारेख**
**पृष्ठ संख्या : १६२ किंमत : ५०० रूपये**

('काव्याग्रह', ऑगस्ट २०२५ च्या अंकात प्रकाशित समीक्षा लेख. इतरत्र वापर करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.) © डॉ. सुधीर राजाराम देवरेब्लॉगचा पत्ता : http://sudhirdeore29.blogspot.com/